J-10/297/17/

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर -४१६ ००४
E-mail: jdhekop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्र. : विसस/उशि/कोवि/२०१६-१७/2103 दिनांक : 03 JUN 2017

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
5958
06.06.2017

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
कोल्हापूर सांगली व सातारा जिल्हा,
कोल्हापूर विभाग कोल्हापूर.

**विषय :-** प्राध्यापकांच्या विविध प्रश्नाबाबत आंदोलनाचे सुटा संघटनेचे संदर्भिय पत्र.

**संदर्भ :-** सुटा संघटनेचे पत्र जा.क्र.५६/२०१७, दि.१६/५/२०१७.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात नमूद केल्याप्रमाणे सहसंचालक कार्यालयात प्राध्यापकांच्या वेतनासंदर्भातील प्रश्न प्रलंबित नाहीत. संबंधित महाविद्यालयांना सविस्तरपणे पत्रव्यवहाराद्वारे आवश्यक वस्तुस्थिती शासन निर्णया आधारे कळविण्यात आलेले आहे. पत्रात नमूद केलेल्या प्रत्येक प्राध्यापकाची नियुक्ती व अनुषंगिक अडी-अडचणी याबाबत सहसंचालकांनी वेळोवेळी संस्थाचालक, प्राचार्य व प्राध्यापक यांच्या समवेत बैठक घेऊन अनेक प्रकरणे निकाली काढलेली आहेत. तथापि संदर्भिय पत्रात नमूद केलेल्या प्राध्यापकांच्या प्रश्नाबाबत शासन/ विद्यापीठ व यु.जी.सी. यांच्याद्वारे सुनिश्चित केलेली शैक्षणिक अर्हता, सेवा शर्ती व अनुषंगिक नियम यांना अनुसरुन स्पष्टपणे पत्रव्यवहाराद्वारे कळविण्यात आलेले आहे. तथापि वेळोवेळी उपोषण करुन सुटा संघटना या कार्यालयावर दबाव तंत्राचा वापर करुन अनियमित प्रकरणांना या कार्यालयाने दबावाखाली मान्यता देण्याविषयी प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट होते. शासन निर्णयामध्ये दि.४/४/२००० नंतर नियुक्त शिक्षकांना नेट / सेट सारखी शैक्षणिक अर्हता अनिवार्य करण्यात आल्याचे स्पष्टपणे नमूद असून अनेक शिक्षकांच्या नियुक्त्या ह्या विहीत शैक्षणिक अर्हता नसतांना केलेल्या दिसून येतात. नियुक्ती प्राधिकारी म्हणून शासन निर्णयाचे अनुपालन करुन शिक्षकांची नियुक्ती करण्याचे अधिकार संस्थेला दिलेले असल्याने वेतन व अनुषंगिक जबाबदारी ही संस्थेची आहे. सहसंचालक कार्यालय हे तदर्थ वेतन अनुदान देते. स्थानिक निवड समितीद्वारे नियुक्त शिक्षक, शिक्षक पदासाठी आवश्यक असणारी विहीत शैक्षणिक अर्हता आजतागायत धारण न करणारे शिक्षक, दि.४/४/२००० नंतर शिक्षक पदासाठी आवश्यक असणारी विहीत शैक्षणिक अर्हता आजतागायत धारण न करणारे शिक्षक यांसारखे विषय मा.संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहेत. नियमबाह्य झालेल्या नियुक्त्यांना अनुदान देणे ही वित्तीय अनियमितता आहे. त्यामुळे संघटनेमार्फत नियमाअंतर्गत उचित प्रश्नांच्या बाबतीत सहसंचालकांना अवगत करणे अभिप्रेत

आहे. तथापि, असे निदर्शनास येते की, संघटनेमार्फत आंदोलनाचे शस्त्र वापरुन दबाव टाकून जाणीव पूर्वक या कार्यालयाची बदनामी करण्याचा प्रयत्न दिसून येतो. याची गंभीर दखल हे कार्यालय घेत असून शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५१६/प्र.क्र.२७३/ २०१६/१६-अ, सामान्य प्रशासन विभाग, दि.२ जानेवारी २०१७ नुसार सुटा संघटनेस पत्र देण्यात आलेले आहे. (प्रत सोबत जोडण्यात येत आहे.) तथापि, न्यायप्रविष्ठ असणा-या प्रकरणी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ वेतन अदायगीचे आदेश देण्यात आलेले आहेत. अनेक शिक्षकांची नियुक्तीसमयी विहीत शैक्षणिक अर्हता नसतांना नियुक्ती केल्याने सदरचे तदर्थ वेतन अनुदान निर्धारणांअती वसुलपात्र असून अनुदान निर्धारणाचे नियोजन करण्यात आलेले आहे. नियुक्तीसमयी विहीत शैक्षणिक अर्हता धारण न करणा-या परंतु सेवेदरम्यान नेट / सेट / एम.फिल./ पी.एचडी अर्हता धारण केलेल्या शिक्षकांना **त्यांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून मूळ वेतनश्रेणीत** विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ वेतन अनुदान हमीपत्र सादर करण्याच्या अटीवर मान्यता या कार्यालयाने दिलेली आहे. सुटा संघटना मागणी करीत असलेल्या अनेक शिक्षकांची नियुक्ती ही आरक्षण कायद्याचे अनुपालन न करता आलेली असल्याचे निदर्शनास आल्याचे महाविद्यालय/ संस्था यांना लेखी अवगत करण्यात आलेले आहे. संबंधित महाविद्यालय / संस्था वा शिक्षक हे **सहसंचालक कार्यालयाने दिलेल्या आदेशाबाबत समाधानी नसल्यास वरिष्ठ कार्यालयाकडे दाद मागू शकतात.** तसेच न्यायालयीन दाद मागण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने प्रदान केलेला आहे. सर्व प्राचार्य / संस्था यांना सूचित करण्यात येते की, शासन नियमांतर्गत आजतागायत दखल न घेतलेली प्रकरणे असल्यास आवश्यक पृष्ठ्यर्थ संदर्भाधिन कागदोपत्री पुराव्यानिशी कार्यालयात दाखल करावीत. आवश्यक सुनावणीअंती योग्य निर्णय संबंधितांना कळविण्यात येईल. तथापि, संस्था/ महाविद्यालय यांच्या अधिनस्त शिक्षक नियमबाह्य मागणीसाठी आंदोनलात सहभागी झाल्याचे निदर्शनास आल्यास गंभीर दखल घेणे क्रमप्राप्त ठरेल.

Seen.
For information.
file.
8/6/17

**आपला विश्वासू,**

**( डॉ. अजय साळी, )**
**विभागीय सहसंचालक (उ.शि.)**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.**

**प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव :-**

1. **मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना सविनय सादर.**
2. **मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई - १८ यांना सविनय सादर.**
3. **मा.पोलीस निरीक्षक, राजारामपुरी, पोलीस ठाणे, कोल्हापूर.**
4. **मा. प्राचार्य, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर.**
5. **सर्व महाविद्यालयांचे संस्था अध्यक्ष / सचिव.**

Confidential.dox